महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पुण्यश्लोक 300

☎- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103
नियंत्रण कक्ष ☎ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 383 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 08 / 10 / 2025

# मोबाईल फॉरेन्सीक व्हॅन नांदेड पोलीस दलात कार्यान्वीत..

गंभीर स्वरूपाचे गुन्हे तसेच खुन,बलात्कार व इतर गंभीर गुन्हे यासारख्या अनेक घटनामध्ये पुरावे नसल्यामुळे किंवा तक्रारदार, साक्षीदार फितुर झाल्याने आरोपी सुटन्याच्या घटना अनेकदा समोर येतात यावर आता राज्य सरकारने मोठा निर्णय घेवुन नविन कायद्यानुसार सात व सात वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्हयाचे तपासाकरीता फॉरेन्सीक पुरावे याचा वापर केला जाणार आहे. यासाठी संपुर्ण महाराष्ट्र पोलीस दलात फॉरेन्सीक मोबाईल व्हॅन कार्यरत करण्यात येणार आहेत बाबत निर्णय घेण्यात आला होता.

त्या अनुषंगाने आज दि. 08 / 10 / 2025 रोजी नांदेड पोलीस दलात उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग भोकर करीता फॉरेन्सीक मोबाईल व्हॅन दाखल झाली. सदर फॉरेन्सीक व्हॅन **मा.श्री.अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड** ,मा.श्री.सुरज गुरव अप्पर पोलीस अधिक्षक,नांदेड,मा. श्रीमती.डॉ.अश्विनी जगताप,उपविपोअ कंधार,पोलीस उपअधिक्षक गृह पोलीस मुख्यालय नांदेड यांनी हिरवी झेंडी दाखवुन कार्यान्वीत केली आहे.

सदर फॉरेन्सीक व्हॅनमध्ये अत्याधुनीक रासायनिक विश्लेषन, उपकरणे, डि. एन. ए. व रक्त नमुणे तपासणी करीता किट्स व डिजीटल पुरावे संकलनाची साधनसामग्री उपलब्ध करण्यात आलेली आहे. सदर व्हॅन ही 24 तास उपलब्ध असून व्हॅनमध्ये सहायक रासायनीक विश्लेषक, वैज्ञाणीक अधिकारी, प्रयोगशाळा सहायक असे फॉरेन्सीक अधिकारी असनार आहेत.

मोबाईल फॉरेन्सीक व्हॅनमुळे घटनास्थळी तात्काळ तपास सुरू करून प्राथमीक निष्कर्ष मिळू शकणार आहेत त्यामूळे वेळेची बचत होवून घटनास्थळावरील पुराव्यांमध्ये छेडछाड होण्याची शक्यता कमी होवून जशास तसे पुरावे पोलीसांच्या हाती लागतील त्यामूळे तपास प्रक्रीयेत गति येईल व न्यायालयीन कार्यवाहीत शंका कुशंकाना वाव राहणार नाही व फॉरेन्सीक तपास वाढवल्याने न्यायदानात पारदर्शकता आणी वेग येईल.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड